**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०९/११/२०२२

## दि.०८/११/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी १०६२/२०२२ भांदवि कलम भा.द.वि.कलम ३९९,४०२ आर्म ॲक्ट कलम ३(२५),४(२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१)(३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८/११/२०२२ रोजी ०१/१५ वा .चे सुमारास बापुजी मंदीराजवळ घोटावडे ते माण रोडवर ता.मुळशी |
| गुन्हा दाखल | :- | दि.०८/११/२०२२ रोजी ०४/२० वा |
| फिर्यादी | :- | कैलास पर्वतराव केंगले पो.हवा ८७३ नेमणुक हिंजवडी पोलीस स्टेशन मो.नं.९८९०३३६९२८ |
| आरोपी | :- | १)अनिकेत ऊर्फ मोन्या अनिल शिंदे वय २० वर्षे रा. स्केच बुड सोसायटी आंबडवट गांव, घोटावडे ता. मुळशी जि. पुणे<br>२)अविनाश घनश्याम पवार वय-३० रा. आलायझीम सोसायटी फलॅट नं. ३०२ युरो स्कुलचे समोर वाकड<br>३) इस्माल करीम शेख वय २० वर्षे रा.के ऑफ ढवळे कोयते वस्ती पुनावळे ता.मुळशी<br>४)रामेश्वर साहेबराव तोगरे वय-२० के/ऑफ गायकवाड गणेशनगर थेरगांव<br>५)सुरज निरंजन पवार वय-२१ रा. आलायझीम सोसायटी फलॅट नं. ३०२ युरो स्कुलचे समोर वाकड<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी नं १ ते ५ यांनी मा.पोलीस आयुक्त साो. पिपंरी चिंचवड यांचे कार्यालयाकडील जावक क्रं.पोआ/८५३०/२०२२ पोलीस आयुक्त पिपंरी चिंचवड यांचे कार्या दि. २८/१०/२०२२ अन्वये घातक शस्त्रे/हत्यारे, बाळगणेस बंदी आदेश असताना सदर आदेशाचा भंग करुन स्वत:चे कब्जात ०२ लोखंडी पिस्टल, २ जीवंत राऊंड, एक लोखंडी पालघन, एक लोखंडी कोयता, मिरची पावडर पुडी, ४ मोबाईल हॅन्डसेट असा सर्व मिळून १,२८,६००/- रुपये किंमतीचे साधनांसह दरोडा टाकण्याचे तयारीत असताना मिळून आले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गोमारे ९९२२७५६८२८ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | रावेत ११७/२०२२ भा.दं.वि कलम ३९२,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०८.११.२०२२ रोजीचे सायंकाळी ०७.१५ वाचे सुमारास, जाधववस्ती कडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाकडे जाण-या रस्त्यावर रावेत, ता. हवेली, जि.पुणे तसेच गणेश तलाव ते परमार सोसायटीचे मधील ओम सुपर मार्केट समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०८/११/२०२२ रोजी २१.४६ वाजता |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय २९ वर्षे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी , फिर्यादी व त्यांची दीड वर्षाची लहान मुलगी हिस नेहमीप्रमाणे फिरवत असताना फिर्यादी यांचे पाठीमागून मोटर सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे गळयातील ५५,०००/- रु किंमतीचे सोन्याचे १२ ग्रॅमचे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र तसेच श्रीमती पुर्वा कुलकर्णी वय ५८ वर्षे रा. सेक्टर २९ निगडी यांचे १९:३० वा. चे दरम्यान गणेश तलाव ते परमार सोसायटीचे मधील ओम सुपर |

मार्केट समोर यांचे ४५,०००/- रु किंमतीचे एक तोळयाचे मंगळसुत्र जबरदस्तीने चोरुन नेले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि जाधव ९४०३६४८६९०

३.

पोस्टे व गु.रजि.नं. :- देहुरोड ६७५/२०२२ भा.द.वि.कलम ३५४(ड),५०७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- एप्रिल- मे २०२२ पासुनते आज पावेतो .प्लॅट नं. ५०७,ड्रिमस्केप होम्स, विकासनगर किवळे पुणे

गुन्हा दाखल :- दि ०८/११/२२ वेळ १५/३७ वा

फिर्यादी :- महीला फिर्यादी वय-२३ वर्षे

आरोपी :- स्वप्नील कल्याण आंधळे रा. माधवनगर सांगली (वय व पत्ता पुर्ण माहीत नाही.)

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी आरोपी यास लग्नाला नकार दिल्याने त्याचा रागा मनात धरुन आरोपी याने फिर्यादी यांचा फोनवरुन तसेच प्रत्यक्ष पाठलाग करुन वारंवार अश्लिल शिवीगाळी करुन तु माझ्याशी लग्न केले नाहीस तर, मी तुझे फोटो इडीट करुन, व्हायरल करुन तुझी बदनामी करीन व तुझे लग्न कसे होते, ते बघतो, अशी धमकी दिली असुन माझ्याशी संबंध ठेव नाही तर मी तुला बदनाम करुन टाकीन तु माझ्याशी लग्न केले नाही तर मी तुझे लग्न होवु देणार नाही, तसेच तु माझ्याशी लग्न केली नाहीस तर, मी आत्महत्या करील व तुला देखील मारुन टाकील, अशी धमकी देवुन फिर्यादी यांचा पाठलाग करुन फिर्यादी यांच्या स्त्रि मनास लज्जा निर्माण होईल असे वर्तन करुन फिर्यादी यांच्या मोबाईल च्या माध्यामातुन पाठलाग करुन विनयभंग केला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गज्जेवार ८१४९५९१६४६

४.

पोस्टे व गु.रजि.नं. :- देहुरोड ६७८/२२ भादवि कलम ३५३,५०४,५०६,३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०८/११/२०२२ रोजी १९/०० वा. देहुरोड पोलीस स्टेशन येथे

गुन्हा दाखल :- दि ०८/११/२२ वेळ १९/४५ वा

फिर्यादी :- निशांत वसंत ठोकळे, पोहवा १३७९ नेमणुक देहुरोड पोस्टे

आरोपी :- १)विक्रम विजय स्वामी वय ३१ वर्षे २) महीला आरोपी वय ३२ वर्षे ३) महीला आरोपी वय ३२ वर्षे सर्व रा पोर्टळ चाळ देहुरोड पुणे
**(आरोपी क्र. २ व ३ यांना सी आर पी सी कलम ४१ (१) (अ) प्रमाणे समजपत्र देऊन सोडण्यात आले आहे.) आरोपी क्र ०१ अटक आहे**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे फर्स्ट रिलीफ ठाणे अंमलदार कर्तव्यावर असताना दुपारी १३/३० वा. चे सुमारास नमुद आरोपी हे शहानुर काझी व त्याची पत्नी यांचे विरुध्द तक्रार देण्याकरीता आले असता त्यांना मा.व.पोलीस निरीक्षक पाटील मॅडम यांचे समोर आम्ही घेवुन गेलो असता मॅडम यांनी त्यांची तक्रार ऐकुण घेतली व तात्काळ देहुरोड मार्शलला कार्यरत असणारे पोना/कोंडलकर व होमगार्ड पानमन यांना शहानुर काझी व त्यांची पत्नी हिस तात्काळ पोलीस स्टेशन येथे बोलावुन समज दिली. व त्यांना सदर ठिकाणी लावण्यात आलेली टपरी काढण्यास सांगितली असता त्यांनी उदया १०/०० वा. पर्यंत टपरी काढुन घेतो असे सांगितले. व त्यांच्या तक्रारी घ्या असे म्हणुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटिल मॅडम या पोलीस स्टेशन हदिदत गेल्या त्यावेळी आरोपी क्र ०१ यांनी शहानुर काझी व पत्नी यांचेविरुध्द तक्रार दिलेवरुन देहुरोड पोलीस स्टेशन अदखलपात्र गुन्हा रजि.क्रमांक १३९७/२०२२ भादंवि कलम ५०६,३४ व शहानुर काझी यांची पत्नी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपी क्र ०१ ते ०३ यांचेविरुध्द अदखलपात्र गुन्हा रजि. क्रमांक १३९८/२०२२ भादंवि कलम ५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. हिंदु मुस्लिम असल्यामुळे दोन्ही पाटर्याना सीआरपीसी १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| | | नोटीस देत असताना नमुद आरोपी यांनी नोटिस घेण्यास नकार दिला व आरोपी क्र ०३ या आज दिनांक ०८/११/२०२२ रोजी १९/०० वा.पर्यंत पोलीस स्टेशन येथे थांबुन आरडा ओरडा करून मी आता आत्महत्या करते तुम्ही शहानुर काझीवर कारवाई का करत नाही असे म्हणुन फिर्यादी व पोलीस स्टेशन येथे हजर असणारे सपोनि/गज्जेवार, मपोना /गवारी, मपोहवा/पटेकर, यांना तसेच वरिश्ठ पोलीस निरीक्षक पाटिल मॅडम यांना गलिच्छ शिवीगाळी करून आम्ही करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा आणला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गायकवाड ९९२२०६११०० |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १७२०/२०२२ भा द वि कलम ३२४,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २२/१०/२०२२ रोजी रात्री ११:४५ वाचे सुमारास राहते घराचे समोर मोरे वकण पोस्ती, मु.पो चिंचोशी, ता खेड |
| गुन्हा दाखल | :- | दि.०८/११/२०२२ रोजी १३.५८ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय-३३ वर्षे |
| आरोपी | :- | अनोळखी चार मुलांनी (वय अंदाजे २५ वर्षे) |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हया लघवीला जाण्यासाठी घराचे बाहेर असलेल्या बाथरूमध्ये जावुन परत घरामध्ये जात असताना अनोळखी चार मुलांनी (अंदाजे २५ वर्षे) अज्ञात कारणासाठी फिर्यादी यांच्या पाठीमागुन येवुन डोक्यावर पाठीमागील बाजुस काठीने जोरात मारले व त्यामधील दुस-या अनोळखी मुलाने फिर्यादी यांच्या छातीवर खो-याने (फावडयाने) मारून जखमी केले तसेच त्यामधील आणखी तिस-या मुलाने तेथील दगड उचलुन छातीवर मारून जखमी केले आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा जाधव ९८२३६११९७९ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | पिंपरी ९५२ /२०२२ भा.द. वि. कलम ४५७,४५४,३८० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/११/२०२२ रोजी २२/०० वा. ते दि.०७/११/२०२२ रोजी ०९/०० वा.सुमारास राम नगर चिंचवड पुणे फि यांचे फस्ट लुक मेंन्स वेअर नावाचे नावाचे कपडे विक्रिचे दुकानात |
| गुन्हा दाखल | :- | दि ०८/११/२०२२ रोजी वेळ ०३ /२३ वा. |
| फिर्यादी | :- | नितिन शंकर दातीर वय ३३वर्षे धंदा- व्यवसाय रा. घर क्रं. ११९९ ढोरे फ्लोअर मिल जवळ, एक्साईड बॅटरी कंपनी रोड, विध्यानगर, चिंचवड, पुणे. मुळगांव- मु. पो. गणेशवाडी ता. कर्जत जि. अहमदनगर |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फि मालकीचे फस्ट लुक मेंन्स वेअर नावाचे नावाचे कपडे विक्रिचे बंद दुकानाचे लोखंडी शटर कशाचे तरी साह्याने उचकटवुन त्या वाटे दुकानात प्रवेश करुन दुकानातील १८५ शर्ट, २६५ जीन्स पॅन्ट, व हुडीज असे एकुण ९४,४५०/- रु किंमतीचे कपडे असा माल फि यांचे संमती शिवाय लबाडीच्या इराद्याने स्वताच्या आर्थिक फायद्या करिता घरफोडी चोरी करुन चोरुन नेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गुळींग ९५५२५७४३१६ |

७.

पोस्टे व गु.रजि.नं. :- सांगवी ५०६ /२०२२, भा. दं. वि.कलम कलम ३७९.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि०७/११/२०२२ रोजी रात्रौ ११.०० वा. ते दि. ०८/११/२०२२ रोजी सकाळी ०८.३० वा. चे दरम्यान सी-५/४, पी. डब्लु. डी. कॉलनी, जुनी सांगवी, पुणे

गुन्हा दाखल :- दि. ०८/११/२०२२ रोजी १३/२९ वा

फिर्यादी :- श्रीनाथ दिनकर जागडे, वय २९ वर्षे, धंदा नोकरी, रा. सी-५/४, पी. डब्लु. डी. कॉलनी, जुनी सांगवी, पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ३०,०००/- रू किमतीची होन्डा कंपनीची ॲक्टिवा ६ जी मोटार सायकल ने एम एच १४ जे जे ००८१ ही रहाते घराचे समोर लॉक व पार्क केली असता ती कोणीतरी अज्ञात इसमाने आर्थिक फायदयाकरिता लबाडीच्या उददेशाने संमतीशिवाय चोरुन नेली आहे

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ डहाळे ९६२३७५४०४७

८.

पोस्टे व गु.रजि.नं. :- आळंदी ३३६ /२०२२ भा.द.वि. कलम ३८०,४६१ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०५/११/२०२२ रोजीचे रात्रौ ०२/३० ते ०३/०० वा मौजे चिंबळी,ता.खेड,जि.पुणे गावचे हद्दीत चिंबळी गावचे हद्दीत गट नं.४०मधील विंडल अँटो कंपनीचे गोडाउन मधुन

गुन्हा दाखल :- दि ०८/११/२०२२ रोजी २०.२३ वा

फिर्यादी :- हरिश निवृत्ती नवले, वय ३० वर्षे, व्यवसाय डेव्हलर्पस, रा. तातवडे, ता. मुळशी जि. पुणे

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी विंडल अँटो कंपनीचे गोडाउन मधुन एकुण १,७०,०००/- रूपये किंमतीचे केबल हा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी चे संमती शिवाय लबाडीचे इरादयाने कंपनीचे गोडाउनचे मागिल बाजुचे खिडकीचे लोखंडी गज तोडुन आत प्रवेश करून दरवाज्याचा आतुन असलेले लॉक तोडुन चोरी करून नेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा लोणकर ८२०८८७२९०७

९.

पोस्टे व गु.रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ४८२/२०२२ भादवि कलम ३०४ अ, ३३८,२७९,मो. वा का. कलम १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०७/११/२०२२ रोजी रात्रौ. २१/१५ वा. च्या दरम्यान सीआरपीएफ गेट जवळ निलया अपार्टमेंट समोर मुंबई पुणे हायवे तळेगाव दाभाडे ता.मावळ जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि.०८/११/२०२२ रोजी २०.१३ वा

फिर्यादी :- श्यामलाल बासुदेव गुंजु वय २५ वर्ष धंदा वॉचमन रा. ऊर्से ता.मावळ जि. पुणे मोनं. ९५७६०६५६३९ मुळ पत्ता सिंचोरशहा आसाम बारूनभारा

आरोपी :- मोटार सायकल क्र. एमएच १४ जे टी ८१०२ वरिल चालक

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने चालवुन धडक देवुन गंभीर जखमी केले व स्वता गाडी नियंत्रित न झाल्याने रस्त्याल्या बाजुच्या झुडपांत धडकुन स्वता जखमी होवुन स्वताच्या मृत्युस कारणीभुत झाला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि पाटील ९१३७२७३४५०

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १७२२/२०२२ भा द वि कलम ४२०, ४०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २०/०२/२०२२ रोजी पासुन ते आज पावेतो तुलीप होम सोसायटी मेदनकरवाडी ता. खेड जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०८/११/२०२२ रोजी २०.०३ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय-३४ वर्षे |
| आरोपी | :- | किसन आनंदराव हांबरडे मुळ रा.३ हुसा ता. नायगाव जि. नांदेड<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हा फिर्यादीकडे आला त्यावेळी त्याने फिर्यादी कडे फिर्यादीची टॉयाटो इटीवॉस कार नं एम एच १४ एफ सी /०१५१ ही भाडे तत्त्वावर चालविण्यासाठी मागीतली. त्यावेळी तो फिर्यादीला सदर गाडीचे भाडे प्रतिमहिणा २० हजार रुपये देतो असे सांगीतले. फिर्यादीला वाटले सदर गाडीला चांगला चालक मिळाला व दरमहा तो आपल्याला २० हजार रुपये देणार आहे. त्यावेळी फिर्यादीचा किसन हांबरडे याचेवर विश्वास पटला होता. त्यावेळी सुरुवातीचे तीन महिने किसन हांबरडे याने फिर्यादीला सदर गाडीचे भाडयाचे पैसे दिले. त्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये किसन हांबरडे हा राहण्यासाठी दुसरीकडे कोठेतरी गेला सोबत फिर्यादीची कार घेवुन गेला आहे. जातांना त्याने फिर्यादीचे कारचे भाडयाचे पैसे देतो असे सांगीतले होते त्यामुळे फिर्यादीने विश्वासाने फिर्यादीची कार किसन हांबरडे यांचे ताब्यात दिलेली होती. त्यानंतर सप्टेंबर ऑक्टोंबर असे दोन महिने गेले परंतु किसन हांबरडे याने फिर्यादीला गाडी भाडयाचे पैसे दिले नाहीत. गाडीचे हप्ते थकले त्यामुळे फिर्यादीने त्याला फोन केला परंतु तो फोन केल्यावर वारंवार पैसे देतो असे सांगत होता. त्यानंतर किसन हांबरडे यास फिर्यादीने फोन केला तो त्याचा फोन बंद करुन ठेवत होता. तेंव्हा त्याने फिर्यादीला कारचे भाडे पण दिले नाही व कारही परत दिली नाही. त्यानंतर समजले की किसन हांबरडे याने फिर्यादीची कार परस्पर कोणाला तरी देवुन त्याची विल्हेवाट लावलेली आहे. व फिर्यादीचा विश्वासघात करुन फसवणुक केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मडके ९८५०२२९३१६ |